पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - आपल्या आयुष्याचे सर्वोत्तम संगीतकार आपणच आहोत. प्रत्येक स्थितीत सुर लावून, आपल्या जीवनाचे संगीत सुंदर बनवा.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७६,८०८.४८ +५४४.१५ +०.७१%
डॉलर ₹ ९४.५५

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २६ |
| दिल्ली | ३९ | २९ |
| मुंबई | ३६ | २९ |
| नागपूर | ३८ | २७ |
| पुणे | ३६ | २४ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | बुधवार, दि. १७ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २१६ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४६ संध्या-७:११

सोने - चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४९,५००/- २,४०,०००/-
Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# मुंबई मेट्रोमुळे दुग्धजन्य पदार्थांना मिळणार मोठी बाजारपेठ

## छत्रपती शिवाजी टर्मिनलवर दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टॉलच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्र्यांना विश्वास

वृत्तसंस्था । मुंबई

**ग्रामीण भागातील दुग्धजन्य पदार्थ आणि अन्य कृषी उत्पादने मोठ्या बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्यासाठी मुंबई मेट्रो हे मोठे आणि प्रभावी माध्यम आहे. यामुळे निश्चितच ग्रामीण भागातील उत्पादनांना मुंबईमध्ये हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**




छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मेट्रो स्टेशन स्थानकावर वारणा सहकारी दूध उत्पादक संघाच्या दुग्धजन्य पदार्थ विक्री स्टॉलच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दुग्धविकास मंत्री अतुल सावे, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे (सावकर), मुंबई महापालिका आयुक्त तथा मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे,तसेच वारणा सहकारी दूध उत्पादक संघाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. मेट्रो स्थानकावर सुरू झालेला वारणा स्टॉल हा केवळ व्यावसायिक उपक्रम नसून कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वारणा समूहाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. वारणा समूहाने दुग्ध व्यवसायाबरोबरच शेतकरी आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य देशासाठी आदर्श असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वारणा परिवाराचे अभिनंदन केले.

**आमदार कोरे म्हणाले की, वारणा समूहाच्या वतीने सुमारे दीड लाख शेतकरी उत्पादकांकडून दररोज दूध संकलित केले जाते आणि त्याचा मोबदला नियमितपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला जातो. या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुग्धजन्य पदार्थांना मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेत थेट प्रवेश मिळावा, यासाठी मेट्रो स्थानकांवरील स्टॉल महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. मुंबईच्या ग्राहक वर्गाला दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ उपलब्ध करून देतानाच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ देण्याचे काम या स्टॉलच्या माध्यमातून होणार आहे.**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई मेट्रो-३ ही शहराची नवी जीवनवाहिनी आहे. आशियातील सर्वात लांब एकेरी भूमिगत मेट्रो आहे. ही मेट्रो केवळ वाहतुकीची सुविधा नसून आर्थिक विकासालाही चालना देणारे व्यासपीठही आहे. मेट्रो स्थानकांवर उभारण्यात आलेल्या व्यावसायिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील उत्पादने थेट शहरी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी निर्माण झाली आहे. कोल्हापूर आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी तयार केलेले दर्जेदार दुग्धजन्य पदार्थ आता मुंबईसारख्या बाजारपेठेत या स्टॉलच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगली बाजारपेठ मिळण्याबरोबरच ग्राहकांनाही दर्जेदार उत्पादने सहज उपलब्ध होणार आहेत. मेट्रो स्थानकांवरील अशा उपक्रमांमुळे रोजगारनिर्मिती, व्यापारवृद्धी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे.

# उद्धव ठाकरेंची शिवसेना २०२९ पर्यंत संपेल

## 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चेवर संजय निरुपम यांचा मोठा दावा

वृत्तसंस्था । मुंबई

**'नेते आणि कार्यकर्ते हळुहळू उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावरील विश्वास गमावत आहेत, ठाकरेंची शिवसेना २०२९ पर्यंत संपेलफ, असे वक्तव्य शिंदेसेनेचे नेते संजय निरुपम यांनी केले.**



राज्याच्या राजकीय वर्तुळात ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरु असून, ठाकरे सेनेचे काही खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावर निरुपम यांनी भाष्य करताना उद्धव ठाकरेंची शिवसेना हळुहळू समाप्त होत असल्याचे मत व्यक्त केले.

'उबाठा पक्ष' हळुहळू समाप्त होत आहे. त्यांच्या आमदार आणि खासदारांचा आता उद्धव ठाकरेंच्या (पान २ वर)

### उबाठांचे ९ पैकी ७ खासदार शिंदेसेनेत जाणार : मंत्री जैसवाल

**मंत्री आशिष जैसवाल यांना याबाबत विचारले असता त्यांनी यावर थेट भाष्य करण्यास टाळले पण, खासदारांचा पक्षप्रवेश झाल्यानंतरच यावर भाष्य करणे उचित ठरेल असे जैसवाल म्हणाले. 'उबाठा पक्षात घडणाऱ्या घडामोडींवर भाष्य करणे मी योग्य समजत नाही. बाळासाहेबांचा वारसा एकनाथ शिंदे चालवत आहेत, असं त्यांना वाटत असेल आणि त्यांना त्यांचा मतदारसंघ आणि राजकीय भविष्याच्या दृष्टीने काही निर्णय घेतला तरच यावर काही भाष्य करणे योग्य ठरु शकते. इतिहास, पक्षांतराचे नियम आणि आकड्यांचे गणित याचा विचार करुन ते काय निर्णय घेतात हे पाहावं लागेल', असे जैसवाल म्हणाले. उबाठांचे ९ पैकी ७ खासदार शिंदेसेनेत जाणार, अशी माहिती समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण झाली आहे.**

## थोडक्यात




### जळगावच्या खत उत्पादक कंपनीचा विक्री परवाना रद्द

**जामनेर ।** तालुक्यात शेकडो शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कृषी आयुक्तालयाने कठोर भूमिका घेत जळगाव येथील सरदार अॅग्रो फर्टिलायझर्स अँड केमिकल्स प्रा. लि. खत उत्पादक कंपनीचा विक्री परवाना कायमस्वरूपी रद्द केला आहे. यासंदर्भात राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी आदेश जारी केले असून, सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे. कृषी आयुक्तालयात दाखल झालेल्या अपीलावर सुनावणी करताना कंपनीच्या सिंगल सुपर फॉस्फेट (एसएसपी) खताच्या गुणवत्तेबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### पाकव्याप्त काश्मीरमध्ये मुनीर यांच्याविरोधात बंद

**रावळकोट ।** येथे जम्मू काश्मीर जॉईंट अवामी अॅक्शन कमिटी आणि अवामी अॅक्शन कमिटीने केलेल्या आंदोलनात पाकिस्तानी लष्कर आणि सरकारवर टीका करताना त्यांनी रेशनचा पुरवठा रोखल्याचा, स्थानिक स्त्रोतांची अडवणूक केल्याचा आणि भारताबरोबर आर्थिक निर्बंध लादल्याचा आरोप केला. यापूर्वी देखील २०२४ आणि २०२५ मध्ये या भागातील नागरिकांनी वाढती महागाई, इलेक्ट्रिसिटी बील आणि पाकिस्तानच्या आर्थिक धोरणावर आंदोलनाच्या माध्यमातून जोरदार प्रहार केला होता. पाकिस्तानने आंदोलनाची दखल घेऊन नागरिकांना काही प्रमाणात दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता, यावर देखील स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली होती.

# आता खोकल्याच्या औषधासाठी डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन बंधनकारक

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**आता देशभरात कफ सिरपसह विविध औषधी सिरप खरेदी करण्यासाठी डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन बंधनकारक असेल. केंद्र सरकारने औषध नियम, १९४५ मध्ये सुधारणा करून सिरपच्या ओव्हर-द-काउंटर विक्रीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.**




नवीन नियम लागू झाल्यानंतर, फार्मसीमधून सिरप खरेदी करण्यासाठी नोंदणीकृत डॉक्टरांनी दिलेले प्रिस्क्रिप्शन दाखवणे आवश्यक असेल.केंद्र सरकारने ९ जून २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे औषधे (पाचवी दुरुस्ती) नियम, २०२६ लागू केले आहेत. ही सुधारणा औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० च्या कलम १२ (पान २ वर)

### औषधांच्या नियमांमध्ये कोणते बदल?

**औषध नियम, १९४५ च्या शेड्यूल मध्ये सूचीबद्ध औषधांच्या श्रेणीतून सरकारने 'सिरप' हा शब्द काढून टाकला आहे. परिणामी, सिरपचे यापुढे ओव्हर-द-काउंटर औषधे म्हणून वर्गीकरण केले जाणार नाही आणि त्यांची विक्री कठोर नियामक नियंत्रणाच्या अधीन असेल.**

# महिला बचत गटांना १ हेक्टर जमिनीसह १ लाखांचे अनुदान

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील महिला बचत गटांसाठी राज्य सरकारने मोठी आणि महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. महसूल विभागाच्या पडीत जमिनींचा उपयोग करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक पात्र महिला बचत गटाला एक हेक्टर (सुमारे अडीच एकर) जमीन पाच वर्षांसाठी वापरण्यास दिली जाणार आहे.**



### गावागावांत असलेल्या अशा पडीत जमिनी उत्पादक बनवण्याचा सरकारचा प्रयत्न


या नव्या धोरणानुसार महिला बचत गट किंवा महिला सहकारी संस्थांना महसूल विभागाच्या मालकीची एक हेक्टर जमीन पाच वर्षांसाठी वापरण्यास दिली जाणार आहे. या जमिनीवर चारा लागवड, बांबू लागवड, नेपियर गवताची शेती किंवा ग्रासलँड डेव्हलपमेंटसारखे प्रकल्प राबवता येणार आहेत.

यासाठी प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद (पान २ वर)

# भारतीय वंशाच्या प्रांजलीने वयाच्या १६ व्या वर्षी उभी केली १०० कोटींची एआय कंपनी!

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

आजच्या काळात तंत्रज्ञान आणि स्टार्टअपच्या जगात वयाचे बंधन उरलेले नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे एका १६ वर्षीय भारतीय तरुणीने. जिथे या वयात मुले आपल्या शालेय अभ्यासात व्यस्त असतात, तिथे प्रांजली अवस्थी या १६ वर्षांच्या मुलीने तब्बल १०० कोटी रुपयांची कृत्रिम बुद्धिमत्ता स्टार्टअप कंपनी उभी करून जगभरात कौतुकाची थाप मिळवली आहे.



प्रांजलीच्या या यशाचा पाया तिच्या घरातच रचला गेला. तिचे वडील स्वतः एक इंजिनिअर आहेत. त्यांच्या मते, इतर विषयांप्रमाणेच संगणक शास्त्र देखील शालेय स्तरावर शिकवले गेले पाहिजे. वडिलांच्या याच विचारामुळे प्रांजलीने वयाच्या अवघ्या ७ व्या (पान २ वर)

# भुसावळ ते शिर्डी थेट रेल्वे सेवा

## खान्देशातील साई भक्तांना स्वतंत्र गाडीमुळे मिळणार दिलासा

प्रतिनिधी । जळगाव

**पुणे रेल्वे स्थानकावरून पुणे-साईनगर शिर्डी दैनंदिन एक्स्प्रेस १७ जूनपासून नव्याने सुरु होत असताना, भुसावळ-शिर्डी दरम्यानही थेट रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी खान्देशातून जोर धरू लागली आहे. जळगाव, भुसावळ, पाचोरा, चाळीसगाव आणि मनमाड ही उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाची जंक्शन रेल्वे स्थानके असून, या परिसरातून दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक शिर्डीला जात असतात. मात्र सध्या थेट रेल्वे सेवेचा अभाव असल्याने प्रवाशांना बदलत्या गाड्यांचा किंवा खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो.**




साईनगर शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक स्थळांपैकी एक मानले जाते. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून दररोज हजारो भाविक शिर्डीत दाखल होत असतात.

पुणे आणि शिर्डी दरम्यान थेट रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अनेकदा रेल्वे बदलणे अथवा रस्ते मार्गाचा पर्याय स्वीकारावा लागत होता. नव्याने सुरू होणाऱ्या या दैनंदिन एक्स्प्रेसमुळे प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे. या अनुषंगाने भुसावळ-शिर्डी थेट रेल्वे सुरू झाल्यास खान्देशातील भाविकांना मोठा दिलासा ठरणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, कुटुंबीय आणि गटपर्यटन करणाऱ्या भाविकांसाठी हा पर्याय अधिक सुरक्षित आणि आरामदायी ठरेल.

रस्ते प्रवासातील खर्च, वेळ आणि शारीरिक त्रास कमी होण्यास मदत होईल. वृद्ध भक्तांना रेल्वेच्या माध्यमातून सहज आणि थेट शिर्डी गाठता येणार असल्याने त्यांच्या प्रवासातील अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होतील.

# जळगावचा 'एक्स्पोर्ट हब' योजनेत समावेश

## कृषी, औद्योगिक उत्पादनांना मिळेल जागतिक बाजारपेठ; जळगावच्या अर्थव्यवस्थेला मिळेल नवी दिशा

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक उत्पादनांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रचालन निर्यात समितीची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत जिल्ह्याचा केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी निर्यात केंद्र (एक्स्पोर्ट हब) योजनेत समावेश झाल्याची माहिती देण्यात आली. यामुळे जिल्ह्यातील केळी, कृषी प्रक्रिया उत्पादने आणि अन्य स्थानिक उत्पादनांच्या जागतिक बाजारपेठ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.**

बैठकीस मुंबई येथील विदेश व्यापार महानिदेशालयाचे (डीजीएफटी) सहमहासंचालक आर. के. मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, निर्यातदार, उद्योजक तसेच संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनीही हजेरी लावली. केंद्र सरकारने देशातील निवडक १२० जिल्ह्यांची निवड निर्यात केंद्र योजनेसाठी केली असून, त्यामध्ये जळगाव जिल्ह्याचाही समावेश करण्यात आला आहे.

या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादनांची ओळख निर्माण करून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मक (पान २ वर)




# पोलिसांच्या आधुनिकीकरणासाठी केंद्राकडून ७३३ कोटी मंजूर

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**बदलत्या काळातील गुन्हेगारीचे आव्हान मोडून काढण्यासाठी आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र पोलिस दल आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज होणार आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी तब्बल ७३३.२८ कोटी रुपये मंजूर केले आहेत.**

या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य सरकार एकत्र आले आहेत. एकूण निधीपैकी ६० टक्के वाटा केंद्र सरकार उचलणार असून, उर्वरित ४० टक्के निधी राज्य सरकारकडून दिला जाणार आहे. या निधीच्या माध्यमातून पोलिस दलाचे संपूर्ण जाळे आधुनिक बनवले जाणार असून, पोलिसांची कार्यक्षमता आणि तपासाचा वेग वाढवण्यास मोठी मदत होणार आहे.

# संपादकीय

## नवनिर्मितीचा ध्यास

एलन मस्क यांनी मिळवलेले यश हे प्रगतीची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहेच. पण त्यातून घेण्याजोगे अनेक धडे आहेत. स्पेसएक्स कंपनीच्या समभागांची विक्री आणि त्यांच्या मूल्यवर्धनातून उद्योगपती एलन मस्क यांची संपत्ती एक लाख कोटी डॉलरहून अधिक झाल्याने जगातील पहिले ट्रिलियनियर म्हणून त्यांच्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांचे हे यश म्हणजे तंत्रज्ञानाच्या आधारे नवनिर्मिती, बुद्धिमत्ता-संशोधनाला दिलेली कष्टांची जोड, जिद्द, दूरदृष्टी आणि जोखीम पत्करण्याचे धाडस अशा विविध गुणांचा संगम आहे. त्यातूनच जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक संपत्तीचे ते धनी बनले. पारंपरिक विचारांचे ओझे टाकून नव्या मार्गाने केलेल्या वाटचालीत त्यांनी गाठलेला हा टप्पा साऱ्या जगासाठी प्रेरणादायी आहेच. तसेच आकर्षक परताव्याच्या आशेने लाखो गुंतवणूकदारांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास ही या घटनाक्रमातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट ठरावी. आजवर केवळ विज्ञान कथांमधूनच शोभाव्यात, अशी कृत्रिम प्रज्ञा, विजेवर चालणारी वाहने किंवा अंतराळातील प्रवास आणि वस्ती अशा अनेक बाबी मानवाच्या आवाक्यात येत आहेत. नव्या युगातील बदलांचा कल्पनेपलीकडचा वेग पाहता त्या कोणत्याही क्षणी आपल्या दाराशी येणार आहेत. त्यामुळे या नव्या वास्तवाची दखल केवळ अमेरिकाच नव्हे, तर जगातील प्रत्येकाने घेतली पाहिजे. केवळ एका व्यक्तीच्या यशापुरते त्याचे मोजमाप करता येणार नाही, तर त्यांच्या टेस्ला, स्पेसएक्स आणि न्यूरलिंक या भविष्यकाळातील तंत्रज्ञानाबाबत नागरिकांना किती आशा आहेत. लक्ष्मीकडे लक्ष्मी जाते, तद्वतच थोडे पैसे असलेले लाखो गुंतवणूकदार प्रचंड संपत्ती असलेल्यांकडे आपला पैसा सोपवतात आणि त्या भांडवलातून ही संपन्न मंडळी गुंतवणूकदारांना परतावा देऊन आपल्याही संपत्तीमध्ये अब्जा-अब्जांनी भर घालतात, हे पूर्वीपासून आढळते. मात्र, केवळ एलन मस्कच नव्हे, तर वर्तमान जगातील पहिल्या दहा श्रीमंतांपैकी बहुतेक सर्व नव्या तंत्रज्ञानावर स्वार झालेल्या उद्योगांचे धनी आहेत. मस्क हेसुद्धा विजेवरील वाहने, उपग्रह आणि कृत्रिम प्रज्ञा या नव्या क्षेत्रात भ्रमंती करणारेच आहेत. मळलेल्या वाटांवर यश मिळवणाऱ्यांच्या पाठीमागे धावण्याऐवजी त्यांनी अशक्यप्राय स्वप्ने पाहिली. नव्या कल्पना मांडून न थांबता त्यांचा अथक पाठपुरावा केला. कधी काळी तेही अपयशाच्या कडेलोटापर्यंत पोहोचले होते. पण त्यांचा नवनिर्मितीचा ध्यास कायम राहिला. त्यातूनच व्यवस्थापनशास्त्रातील ब्लू ओशन थिअरीनुसार स्पर्धेपलीकडे जाऊन नव्या क्षितिजांवर विहार केला आणि त्यातूनच आपले साम्राज्य उभे केले. हे ध्यानात घ्यावे लागेल. आता स्पेसएक्सच्या आयपीओतून उभारलेले भांडवलही ते ऑर्बिटल डेटा सेंटर, चंद्रावरील कारखाना आणि मंगळ मोहीम अशा नव्या उपक्रमांतच गुंतवणार आहेत. मानवी बुद्धीच्या उड्डाणांना अंतराळाच्याही मर्यादा राहिलेल्या नाहीत, याचेच हे द्योतक म्हणावे लागेल. भारतातील सद्यस्थिती पाहता, संशोधन आणि विकासामध्ये सरकार आणि उद्योगजगतालाही मोठी मजल मारावी लागणार आहे. सक्षम मनुष्यबळ घडवणे,ही त्याची पहिली पायरी आहे. त्यासाठी शिक्षण आणि त्यातही मूलभूत विज्ञान-तंत्रज्ञानाच्या शिक्षणावर अधिकाधिक भर द्यावा लागेल. करियरच्या पारंपरिक वाटांबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळसंशोधन, सेमीकंडक्टर अशी नवी क्षेत्रे काबीज करण्यासाठी नव्या पिढीला उद्युक्त करावे लागेल. मस्क यांनी गाठलेले हे स्थान कौतुकास्पद आहेच. मात्र विख्यात लेखक मारिओ पुझो यांनी गॉडफादर कादंबरीत अमर केलेल्या प्रत्येक नेत्रदीपक उत्कर्षामागे काही गुन्हा असतो, या वचनाप्रमाणे मस्क यांच्या यशालाही नियमांचे उल्लंघन, कृष्णवर्णीयांशी भेदभाव आणि युद्धांमधील संशयास्पद भूमिका अशा कृत्यांची काळी किनार आहेच.

# कोळी महासंघाचे धरणे आंदोलन

## जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या मिळण्यासाठी कोळी समाजबांधव आक्रमक

प्रतिनिधी । जळगाव

**कोळी महासंघ राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार रमेश पाटील यांच्या नेतृत्वात व युवा प्रदेश अध्यक्ष ॲड. चेतन पाटील यांच्या मार्गदर्शनात जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले.**




गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले आंदोलन टोकरे कोळी जमातीच्या प्रश्नांसंदर्भात तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने अंमलबजावणी होणे अपेक्षित होती. परंतु महाराष्ट्र राज्यातील विधानसभा, नगरपरिषद महानगरपालिका जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे महाराष्ट्र शासनाकडून आदिवासी टोकरे कोळी समाजाचे परिपत्रक काढण्यास दिरंगाई झाल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

समाजाची भावना व कोळी महासंघाने केलेल्या पाठपुरावाच्या अनुषंगाने आपणास या स्मरण पत्राद्वारे पुन्हा एकदा विनंती करण्यात येत आहे की मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीतील बांधवांचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रित्या मिळणे व रक्त नात्यातील समाज बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत दि.२० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व इतिवृत्ताप्रमाणे आपण त्वरित परिपत्रक काढण्याकरिता मुख्यमंत्री महोदयांना पत्र पाठवावे. तसेच जळगाव जिल्ह्यात अनुसूचित जमाती (एस टी) प्रमाणपत्र तपासणी समितीचे कार्यरत कार्यालय पुर्ण क्षमतेने तात्काळ पूर्ण वेळ सुरू करण्यात यावे. तसेच ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्ष मुदत वाढ मिळावी, असे लेखी निवेदन आज जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे राज्यव्यापी एकदिवसीय धरणे आंदोलन करून जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

**यांचा होता आंदोलनात सहभाग**

यावेळी आदिवासी टोकरे कोळी समन्वय समिती जळगाव जिल्हा अध्यक्ष जितेंद्र सोनवणे, कोळी महासंघ जेष्ठ नेते बाळासाहेब सैंदाणे, कायदेशीर सल्लागार ॲड. अमित सोनवणे, जिल्हाध्यक्ष हरिलाल कोळी, मुकेश सोनवणे, संपर्क प्रमुख सुभाष सोनवणे, टोकरे कोळी आंदोलनकर्ते प्रल्हाद सोनवणे, युवा अध्यक्ष संदीप कोळी, नितीन कांडेलकर, नगरसेवक किशोर बाविस्कर, दिपक तायडे, नारायण कोळी, व्हि. टी. सोनवणे, संतोष कोळी, रामचंद्र कोळी, मंगला सोनवणे, मंदा सोनवणे, रत्ना बागुल, सुमन मराठे, योगेश बाविस्कर, गुलाब बाविस्कर, गजानन सोनवणे, आकाश कोळी, रघुनाथ कोळी, देविदास कोळी, विजय बाविस्कर, खेमचंद कोळी, विशाल सपकाळे, भाईदास कोळी, पितांबर कोळी, महेश कोळी, रोहन सोनवणे, किरण तायडे, पांडुरंग सोनवणे यांच्यासह कोळी महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुध निर्माणी कर्मचाऱ्यांच्या मदतीने कॅन्सरग्रस्त माऊलीला मिळाले जीवनदान

प्रतिनिधी । भुसावळ

**संकटाच्या काळात माणुसकीचा हात देत आयुध निर्माणी वरणगावच्या कर्मचारी व अधिकारी यांनी एका कॅन्सरग्रस्त माऊलीला नवजीवन दिल्याची हृदयस्पर्शी घटना नुकतीच समोर आली आहे.**

शासकीय योजनांचा लाभ तांत्रिक कारणांमुळे मिळू न शकल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबाला आयुध निर्माणीतील अधिकारी, कर्मचारी व कामगार युनियनने मोठा आधार दिला. त्यांच्या आर्थिक सहकार्यामुळे नाशिक येथील खाजगी रुग्णालयात कॅन्सरवरील अवघड शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली असून संबंधित महिलेची प्रकृती सुधारत आहे. आयुध निर्माणी वरणगाव येथे ग्रॅज्युएट अप्रेंटिस म्हणून कार्यरत असलेल्या ललिता तळेले (रा. विवरा बु.) यांच्या आईला काही दिवसांपूर्वी कर्करोगाचे निदान झाले होते. ललिताचे वडील हयात नसल्याने आणि कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी तिच्यावर असल्याने उपचाराचा खर्च उचलणे कठीण झाले होते. त्यातच काही तांत्रिक कारणांमुळे शासकीय आरोग्य योजनांचा लाभही मिळू शकला नव्हता. अशा कठीण परिस्थितीत आयुध निर्माणीमधील प्रविण चौधरी व संतोष प्रजापती तसेच इतर संवेदनशील सहकारी मदतीसाठी पुढे सरसावले. त्यांनी सोशल मीडियासह विविध माध्यमांतून मदतीचे आवाहन केले. त्यांच्या या आवाहनाला आयुध निर्माणीतील कर्मचारी, अधिकारी व मित्रपरिवाराने उत्स्फूर्त प्रतिसाद देत आर्थिक मदतीचा हात पुढे केला. प्रविण चौधरी यांनी केवळ युनियन पदाधिकारी म्हणून नव्हे, तर ललिताच्या पाठीशी मोठ्या भावाप्रमाणे खंबीरपणे उभे राहत सर्व आवश्यक व्यवस्था केली. त्यांच्या या संवेदनशील भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे. दरम्यान, नाशिक येथील खाजगी रुग्णालयात झालेली कॅन्सरवरील शस्त्रक्रिया यशस्वी ठरली असून रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. या मदतीमुळे मोठे संकट टळल्याची भावना व्यक्त करत ललिता तळेले व त्यांच्या परिवाराने सर्व कर्मचारी, अधिकारी, मित्रपरिवार आणि मदतकर्त्यांचे आभार मानले आहेत. वरणगाव आयुध निर्माणी परिवाराने दाखविलेली ही सामाजिक बांधिलकी आणि माणुसकी समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# शिंदखेडा नगरपंचायत हद्दीत अस्वच्छता, नागरिकांची तक्रार

प्रतिनिधी । शिंदखेडा

**येथील रथ गल्ली परिसरातील नदीकाठ अस्वच्छ परिसर स्वच्छ होईल का असा सवाल जसवंत राजपूत यांच्यासह इतर नागरिकांनी उपस्थित केला आहे. शिंदखेडा शहरात रथ गल्ली परिसरात श्री दत्त मंदिर परिसर असून दत्त मंदिराला लागून बुराई नदीचा परिसर आहे. मात्र नगरपंचायत शिंदखेडा स्वच्छता विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.**

संपूर्ण गावातील सांडपाणी गटारीच्या माध्यमातून या परिसरातील नदीपात्रात सोडण्यात आले आहे. नदीपात्रात सांडपाण्यामुळे साचलेल्या पाण्यात डासांसह विषारी प्राणी यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. गेल्या पंचवार्षिक काळात या परिसरातून नको ते सुशोभीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यामुळे गटारीच्या पाण्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने होत नाही. त्यातच या परिसरात महिलांसाठीचे शौचालय उभारण्यात आले आहे तेथीलही पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे हा परिसर अतिशय धोकेदायक झालेला आहे. याबाबतीत नगरपंचायतीच्या आरोग्य विभाग व नगरपंचायतीचे मुख्याधिकाऱ्यांकडे नागरिकांनी लेखी निवेदन दिलेली आहे.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी मुकबधिर विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी । धरणगाव

**नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी व उत्साह निर्माण करण्याच्या उद्देशाने के. जी. गुजराथी मुकबधिर निवासी विद्यालय, धरणगाव येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.तसेच मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करून नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात करण्यात आली.**



यावेळी विद्यालय परिसर आकर्षक फुलांची सजावट व सुंदर रांगोळीने सजविण्यात आला होता. शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक वाल्मीक पाटील यांच्या हस्ते मोफ त शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थी व पालकांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी नवीन विद्यार्थ्यांच्या पालकांना विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांची, निवासी सुविधांची तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. मुख्याध्यापक वाल्मीक पाटील व शिक्षक रोहन पवार यांनी पालकांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विद्यालय कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शाळेच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. विशेषतः नवीन विद्यार्थ्यांनीही उत्साहाने शाळेत प्रवेश घेतला. या उपक्रमामुळे शाळेतील वातावरण अधिक सकारात्मक व प्रेरणादायी बनल्याचे पालकांनी सांगितले. याप्रसंगी रामकृष्ण पाटील, नंदकुमार पाटील, दीपक जाधव, संतोष भडांगे, किशोर पाटील, योगेश पाटील, दिलीप पाटील, उमेश पाटील, गोपाल पाटील, आरीफ शाह, अमोल सोनवणे, कल्पना ठाकरे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करून के.जी. गुजराथी मुकबधिर निवासी विद्यालयाने शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये आत्मीयता व आनंद निर्माण करण्याचा आदर्श उपक्रम राबविला.

# पान १ वरुन

**उद्धव ठाकरेंची शिवसेना......**

नेतृत्वावर विश्वास राहिलेला नाही. २०२९ पर्यंत हा पक्ष संपेल. त्यांच्या पक्षातील नेते, कार्यकर्ते दररोज पक्ष सोडत आहेत. उबाठा खासदारांचा विचार करता आमचा आणि त्यांचा काही संबंध नाही. हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. पण, हा पक्ष हळुहळू संपेल आणि लोक त्यांची साथ सोडतील, असे संजय निरुपम एका वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले. ऑपरेशन टायगरवर बोलताना निरुपम यांनी नेते आणि कार्यकर्त्यांचा ठाकरेंवर विश्वास राहिला नसल्याचे नमूद केले.

**आता खोकल्याच्या......**

आणि ३३ अंतर्गत करण्यात आली आहे आणि ती अधिकृत राजपत्रात प्रकाशित होताच प्रभावी झाली आहे. नवीन नियमानुसार, कफ सिरपसह औषधी सिरप खरेदी करण्यासाठी, ग्राहकांना नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने जारी केलेले प्रिस्क्रिप्शन दाखवावे लागेल. याचा परिणाम त्या सामान्य खरेदीवर होईल, जे आतापर्यंत लोक थेट मेडिकल स्टोअर्समधून खरेदी करत होते.

**जळगावचा एक्स्पोर्ट......**

स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न आगामी काळात केला जाणार आहे. स्थानिक उत्पादनांना ब्रँडिंग, विपणन, पायाभूत सुविधा आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. भुसावळ येथे ड्रायपोर्ट प्रस्तावित - जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या निर्मितीवरही भर देण्याच्या दृष्टीने बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. भुसावळ येथे प्रस्तावित ड्रायपोर्ट प्रकल्पाबाबत केंद्रीय पथकाची पाहणी पूर्ण झाली असून, या प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेला गती देण्याचे संकेत देण्यात आले. ड्रायपोर्टमुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होऊन निर्यात प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच कृषी उत्पादनांच्या साठवणुकीसाठी २५ हजार मेट्रिक टन क्षमतेचा आधुनिक शितगृह उभारणीचा प्रस्ताव पुढे नेण्याबाबत चर्चा झाली. केळीसह इतर नाशवंत कृषी उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी अशा सुविधांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. याशिवाय जळगाव येथे प्लास्टिक चटई समूह विकास केंद्र (क्लस्टर) विकसित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पामुळे स्थानिक उद्योगांना चालना मिळून रोजगार निर्मितीला मदत होणार आहे. तर निर्यातवाढीस मोठा हातभार - बैठकीत जिल्ह्यातील निर्यातदारांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणींचाही आढावा घेण्यात आला. निर्यातीसाठी आवश्यक भांडवल सहज उपलब्ध व्हावे यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी निर्यातदारांना सुलभ पतपुरवठा करावा, अशा सूचना संबंधित वित्तीय संस्थांना देण्यात आल्या. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातील उद्योजकांना आर्थिक सहाय्य मिळाल्यास निर्यातवाढीस मोठा हातभार लागेल, असे मत व्यक्त करण्यात आले. जळगाव जिल्ह्याची ओळख असलेल्या केळी निर्यातीबाबतही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. केळी निर्यातदारांनी पायाभूत सुविधा, साठवणूक व्यवस्था, वाहतूक आणि निर्यात प्रक्रियेतील अडचणींबाबत विविध मागण्या मांडल्या. या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

**महिला बचत गटांना......**

करण्यात आली आहे. हा निधी जिल्हा नियोजन समिती किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. या योजनेतून महिला बचत गटांना मोठे आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असा दावा सरकारने केला आहे. बावनकुळे यांच्या मते, एका बचत गटाला अडीच एकर जमीन दिल्यानंतर त्यावर चारा किंवा बांबू लागवड केल्यास वर्षाला सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. विशेष म्हणजे या उत्पन्नावर सरकारचा कोणताही दावा राहणार नाही. जमिनीवरून मिळणारा संपूर्ण नफा आणि उत्पन्न संबंधित महिला बचत गटालाच मिळणार असल्याने ग्रामीण भागातील महिलांसाठी ही मोठी आर्थिक संधी ठरू शकते. महसूल विभागाकडे मोठ्याप्रमाणात अशा जमिनी आहेत. ज्या सध्या पडीत आहेत आणि पुढील अनेक वर्षे कोणत्याही सरकारी प्रकल्पासाठी वापरात येण्याची शक्यता नाही. अशा जमिनींवर अनेकदा अतिक्रमण होत असल्याची समस्या आहे. त्यामुळे या जमिनी महिला बचत गटांच्या माध्यमातून वापरात आणल्यास एकीकडे रोजगार निर्मिती होईल आणि दुसरीकडे सरकारी जमिनींचे संरक्षणही होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. बावनकुळे यांनी सांगितले की, गावागावांत असलेल्या अशा पडीत जमिनी उत्पादक बनवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

**भारतीय वंशाच्या प्रांजलीने ......**

वर्षी कोडिंग शिकण्यास सुरुवात केली. पुढे वयाच्या ११ व्या वर्षी जेव्हा तिचे कुटुंब अमेरिकेतील फ्लोरिडा येथे स्थायिक झाले, तेव्हा तिची कॉम्प्युटर सायन्स आणि गणित या विषयांवरील पकड आणखी घट्ट झाली.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी किसान सभेचा शिंदखेडा येथे शेतकरी मेळावा

प्रतिनिधी । शिंदखेडा

**धुळे जिल्हा राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी किसान सभेचे प्रांत अध्यक्ष ॲड. वसंतराव मानकर यांच्या नेतृत्वाखाली किसान सभेच्या संघटनात्मक बांधणीसह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्याच्या उद्देशाने शिंदखेडा येथे बिजासनी मंगल कार्यालयात शेतकरी कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला.**



मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे हे होते. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करून संघटना व सत्तेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे कसे सोडवता येतील याबाबत गांभीर्याने विचार विनिमय करण्यात आला. गाव तेथे राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी किसान सभेची शाखा निर्माण करा व शेतकऱ्यांना संघटित करा, असे प्रांताध्यक्ष वसंतराव मानकर यांनी सांगितले. किसान सभेचे प्रदेश कार्याध्यक्ष अभिजीत घोरपडे, सरचिटणीस दत्तात्रय तळोले पाटील, डॉ. गणेश डोंगरे, बबनराव तिकांडे, सुरेश सोनवणे, कामराज निकम, नगराध्यक्षा कलावती माळी, संजीवनी गांगुर्डे, डॉ. नितीन चौधरी, राकेश माळी, पुष्पा सोनवणे, रेखाताई सुर्यवंशी, दीपक जगताप, सुभाष माळी, अरुण देसले, राहुल पाटील, महेंद्र पाटील, विलास देसले, मनोज महाजन उपस्थित होते.

# खांडबारा येथे विजेचा लपंडाव; नागरिक उकाड्यामुळे त्रस्त

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील खांडबारा प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक आणि व्यापारी प्रचंड त्रस्त झाले आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता दिवसातून अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याने दैनंदिन व्यवहारांवर विपरीत परिणाम होत असून महावितरणच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली.**

उन्हाचा कडाका वाढलेला असताना आणि पावसामुळे कोणताही विशेष अडथळा नसतानाही वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. अचानक जाणाऱ्या वीजेमुळे घरगुती तसेच व्यावसायिक वापरातील फ्रीज, टीव्ही, पंखे, इन्व्हर्टर, संगणक यांसारख्या विद्युत उपकरणांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी अनेकांना आर्थिक फटका बसत आहे. व्यापारी वर्गालाही या समस्येचा मोठा फटका बसत आहे. महावितरणने वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी नागरिकांना सूचना द्यावी, अशी मागणी होत आहे.

# उन्हामुळे जिल्ह्यातील एक सत्र शाळांच्या वेळेत बदल करा

## माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना समन्वय समितीची अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यात सध्या वाढलेल्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील एका सत्रात भरणाऱ्या सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दि. ३० जूनपर्यंत सकाळी ७.०० ते दुपारी १२.०० या वेळेत भरविण्याबाबत आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना समन्वय समिती, जळगाव जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली.**




यासंदर्भातील निवेदन अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, जळगाव जिल्ह्यात दि. १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाला असला तरी जिल्ह्यात उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व पंख्यांची पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता, उपस्थिती व अध्ययन-अध्यापन प्रक्रियेवर विपरीत परिणाम होत आहे.

विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून जिल्ह्यातील एका सत्रात भरणाऱ्या सर्व शाळांची वेळ तात्पुरत्या स्वरूपात सकाळी ७.०० ते दुपारी १२.०० अशी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी समन्वय समितीचे अध्यक्ष गिरीश नेमाडे, कार्याध्यक्ष प्रकाश आनंदा पाटील, समन्वयक तथा संचालक तुळशीराम सोनवणे, डॉ. मिलिंद बागुल, पी. एस. सोनवणे, संतोष कचरे, शशिकांत राणेराजपूत, बाजगीर सर, उपाध्यक्ष गोविंदा पाटील, सुनील वानखेडे, सुरेश अहिरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सदर निवेदनाची प्रत शिक्षक आमदार किशोर दराडे, पदवीधर आमदार सत्यजित तांबे तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जळगाव यांना माहितीस्तव देण्यात आली आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
*** कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१६७४ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाबाई यांचा पाचाड येथे स्वर्गवास.

१८९५ : महाराष्ट्र सेवक, थोर समाजसुधारक व फर्ग्युसन कॉलेज पुणेचे प्राचार्य गोपाळ गणेश आगरकर यांचे निधन.

१९६७ : चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.

१२९७ : संत निवृत्तीनाथ महाराज यांनी समाधी घेतली.

## थोडक्यात

### श्री.गो.से.हायस्कूल येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात



**पाचोरा ।** पाचोरा तालुका सह. शिक्षण संस्थेच्या श्री.गो.से. हायस्कूल येथे शासनाणे निर्देशित केल्याप्रमाणे दि.१५ जून रोजी शाळा प्रवेशोत्सव पी.टी.सी.संस्थेचे अध्यक्ष दिलीप वाघ यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी आठ वाजता संपन्न झाला. शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमासाठी व्यासपीठावर संस्थेचे चेअरमन संजय वाघ, शालेय समिती चेअरमन खलील देशमुख, संचालक वासु महाजन, प्रकाश पाटील, प्रा. भागवत महालपुरे, सौ. जिजाबाई पाटील, मुख्याध्यापक एन.आर.पाटील, उपमुख्याध्यापक आर.एल. पाटील, अभिजीत खैरनार, सौ. ए.आर गोहिल, राजेश बांठिया, महेश कौंडिण्य उपस्थित होते.

### वाळूमाफियांविरोधात तलाठी संघटना आक्रमक

**जळगाव ।** तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन आणि गौणखनिज वाहतुकीविरोधातील कारवाईदरम्यान महसूल कर्मचाऱ्यांना अनेक गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा जळगाव तालुका तलाठी संघटनेने उपस्थित केला आहे. या संदर्भात संघटनेने जळगाव उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. आवश्यक उपाययोजना आणि पोलीस मनुष्यबळाची उपलब्धता होईपर्यंत रात्रीच्या स्थिर बैठे पथकाचे कामकाज थांबविण्याचा निर्णय घेतल्याचेही नमूद केले आहे. यावेळी राहुल सोनवणे, रुपेश ठाकूर, प्रशांत पाटील, राजेश भंगाळे, अजयसिंग ठाकूर, आशिष वाघ, आकाश काळे, भावेश रोहीमारे, मालती चाफळे, आकाश कडभाने, सुदेश चौधरी, निकिता पष्टे, प्रतिभा नवले, पूनम काळे, हर्षदा दळवी उपस्थित होते.

# दीड महिन्यात ७७१ वाहनांवर कारवाई

## अमळनेर विभागीय पोलिस उपअधीक्षक विनायक कोते यांची माहिती

प्रतिनिधी । अमळनेर

**वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या वाहनचालकांविरोधात अमळनेर विभागीय पोलिसांनी विशेष मोहीम राबवत गेल्या दीड महिन्यात ७७१ वाहनांवर कारवाई केली असून तब्बल ७ लाख ९२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. विभागीय पोलिस उपअधीक्षक विनायक कोते यांनी सदर माहिती दिली.**



वाहतूक नियमांचे पालन न केल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. मद्यपान करून वाहन चालवणे, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे, विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, परवान्याशिवाय वाहन चालवणे, अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देणे, हेल्मेटचा वापर टाळणे, बेशिस्त पार्किंग करणे आणि तांत्रिकदृष्ट्या दोषपूर्ण वाहने रस्त्यावर आणणे यांसारख्या प्रकारांवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

### नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई कायम

अवैध प्रवासी वाहतूक, कर्कश सायलेन्सरचा वापर, मद्यपान करून वाहन चालवणे, भरधाव वेगाने वाहन चालवणे आणि बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांविरोधातील मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे डीवायएसपी विनायक कोते यांनी स्पष्ट केले. कारवाईचा उद्देश नागरिकांना शिक्षा करणे नसून वाहतुकीत शिस्त निर्माण करणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करणे हा आहे. मात्र, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### विभागनिहाय कारवाई

अमळनेर हद्दीत अवैध प्रवासी वाहतुकीच्या २०, मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या १६ आणि इतर ४०१ वाहनांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४ लाख ८९ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पारोळा हद्दीत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ९, मद्यपान करणाऱ्या ४ आणि इतर ६५ वाहनांवर कारवाई करून ६० हजार २०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. एरंडोल हद्दीत अवैध प्रवासी वाहतुकीच्या १४, मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या १६ आणि इतर १५२ वाहनांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत १ लाख ३२ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल झाला. मारवड हद्दीत अवैध प्रवासी वाहतुकीच्या ७ आणि इतर ६७ वाहनांवर कारवाई करून १ लाख १० हजार २०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

## जयकिरण प्रभाजी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत




प्रतिनिधी । पाचोरा

**जयकिरण प्रभाजी शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित न्यू इंग्लिश मीडियम स्कूल येथे नवीन शैक्षणिक वर्षात पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.**

शाळेच्या परिसराची स्वच्छता, वर्गखोल्यांची सजावट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत विशेष उपक्रमांद्वारे करण्यात आले असून नवीन विद्यार्थ्यांना शाळेच्या नियमावली,शैक्षणिक उपक्रम आणि विविध सुविधांची माहिती दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिनेश बोथरा, उपाध्यक्षा गौरी कुलकर्णी, सचिव जीवन जैन, सहसचिव संजय बडोला, खजिनदार जगदीश खिलोशिया, स्कूल कमिटी चेअरमन लालचंद केसवाणी, सचिव रितेश ललवाणी, संचालक संजय चोरडीया, गुलाब राठोड, प्रभुलाल शर्मा, गोपाल पटवारी,प्रिती जैन, संगिता बोथरा, महेंद्रकुमार हिरण, अशोककुमार मोर, शेखरकुमार धाडीवाल यांच्या आदेशाने मुख्याध्यापिका पुष्पलता पाटील व सीईओ अतुल चित्ते व निर्मला पाटील, प्रतिभा मोरे, रुपाली जाधव प्रिती शर्मा, पुजा पाटील, ज्योती बडगुजर, कविता जोशी, अश्विनी पाटील, भाग्यश्री ब्राम्हणकर, विद्या थेपडे आदींनी परिश्रम घेतले.

## अमळनेरात २७.५ ब्रास वाळू, ४६ लाखांचा मुद्देमाल जप्त

### अवैध वाळू वाहतुकीविरोधात प्रांताधिकाऱ्यांची धडक कारवाई

प्रतिनिधी । अमळनेर

**अवैध वाळू वाहतुकीविरोधात अमळनेरचे उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी दि. १५ जून रोजी पहाटे गोपनीय पद्धतीने धडक कारवाई करत दोन डंपर, सुमारे २७.५ ब्रास वाळू आणि अन्य साहित्य असा एकूण ४६ लाख ६६ हजार ३२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन डंपर चालकांविरुद्ध चोपडा पोलीस निरीक्षक पवन देसले यांना गुन्हा नोंद करण्यास सांगितले.**



वाळूचे अधिकृत ठेके बंद असतानाही परिसरात अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांना मिळाली होती. मंडळाधिकारी गौरव शिरसाठ, ग्राम महसूल अधिकारी जितेंद्र पाटील, अमोल पाटील यांना केवळ रात्रीची गस्त असल्याचे सांगून त्यांनी पहाटे चोपडा तालुक्याकडे मोर्चा वळवला. यावल रोडवरील बडगुजर पेट्रोल पंपाजवळ डंपर क्रमांक जीजे-०७-व्हीडब्ल्यू-७९३५ हा सुमारे अडीच ब्रास वाळू वाहतूक करताना आढळून आला. वाहन अडवून पंचनामा करण्यात आला. चालक मनोज कैलास कोळी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव जल्लोषात

प्रतिनिधी । चोपडा

**श्री योगेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ कमळगाव संचलित अहिल्याबाई होळकर माध्यमिक विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात गावात प्रभातफेरी काढून जनजागृती करीत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.**



इयत्ता ५वी व सर्व वर्गातील नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे व सर्व विद्यार्थ्यांचे शालेय पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव पंडित न्हायदे, ग्रामपंचायत सदस्य संजय न्हायदे, पालक वर्ग तसेच मुख्याध्यापक, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुलांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शालेय पोषण आहारासोबत गोड मिष्ठान्न देण्यात आले. नवीन वर्षाच्या शुभारंभ प्रसंगी सर्व विद्यार्थी शिक्षक पालक सर्व आनंदी होते. सूत्रसंचालन एस.एस.जाधव यांनी केले. तसेच आभार अर्जुन कोळी यांनी मानले.

## पोलिस ॲक्शन मोडवर; शहरातील सराईत गुन्हेगारांवर विशेष कारवाई !



प्रतिनिधी । जळगाव

**जिल्हा पोलीस दलाने आज पहाटेपासून जळगावात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरोधात मोठी विशेष धडक कारवाई हाती घेतली आहे. पहाटे सुमारे ४ वाजता सुरू झालेल्या या मोहिमेत सराईत गुन्हेगार, टोळ्या तसेच विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या संशयित व्यक्तींना लक्ष्य करण्यात आले आहे.**

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या या कारवाईसाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये स्थानिक पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच रायट कंट्रोल पथक यांचा सहभाग असून शहरातील विविध भागांमध्ये एकाचवेळी धाडी टाकण्यात आल्या. या कारवाईदरम्यान अनेक संशयित व सराईत गुन्हेगारांच्या निवासस्थानांची झडती घेण्यात आली. तसेच शहरातील विविध ठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. मालकीबाबत शंका अथवा आवश्यक कागदपत्रे नसलेली वाहने पुढील चौकशीसाठी संबंधित पोलीस ठाण्यात जमा करण्यात येत आहेत. यावेळी गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या अनेक व्यक्तींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. त्यांच्याकडून सविस्तर चौकशी करण्यात येत असून इंट्रोगेशन फॉर्म भरून घेण्यात येत आहे.

## डांगर उर्फ उदयनगरला टँकरने पाणीपुरवठा

प्रतिनिधी । अमळनेर



**अमळनेर तालुक्यातील डांगर उर्फ उदयनगर हे विद्यमान खासदार स्मिता वाघ यांचे गाव. या गावाला सुमारे २५ वर्षांपासून पिण्याचे पाणी टँकरने पुरवावे लागत आहे, अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उपाध्यक्ष प्रा.अशोक पवार यांनी व्यक्त केली आहे.**

पवार यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या पंचवीस-तीस वर्षांपासून स्मितातांई या जळगाव जिल्ह्यातील राजकारणात सक्रिय आहेत. त्यांचा राजकीय प्रवास, जळगाव जिल्हा परिषद सदस्य, जळगाव जिल्हा परिषद अध्यक्ष, विधान परिषद आमदार आणि आता खासदार आहेत. भाजप पक्षाच्या जिल्हा व राज्य पातळीवर पदाधिकारी शिवाय अनेक समित्यांवर कार्यरत, उत्कृष्ट संसद पटू म्हणून पुरस्कार इत्यादी स्मितातांईना अनेक सत्तेची पदे मिळाली, मानसन्मान मिळाला. परंतु डांगर उर्फ उदयनगरच्या ग्रामस्थांना कोणत्याही योजनेतून कायमस्वरूपी पिण्याचे पाणी मिळाले नाही. आजही डांगर उर्फ उदयनगरला टँकरने पाणीपुरवठा होत आहे. ही बाब योग्य नाही. सामान्य माणसाला प्रश्न पडतो की सत्ता कोणासाठी वापरली जात आहे? व कोणते प्रश्न सुटत आहेत.? पाण्यासाठी टँकर सुरू केल्याने शासनाचा प्रचंड खर्च वाढतो. ग्रामस्थांना पुरेसे पाणी मिळत नाही.पाण्याच्या शुद्धतेबाबत कोणतीही गॅरंटी देता येत नाही. ग्रामस्थांना दूषित पाण्यामुळे आजार होतात. सरकारी दवाखाने ही व्हेंटिलेटरवर असल्याने खाजगी डॉक्टरांचा खर्च ग्रामस्थांना परवडत नाही, परंतु खर्च करावाच लागतो, प्रसंगी काहींना दैनंदिन खर्चासाठी कर्जही काढावे लागते, याचा अर्थ टँकरचे पाणी एका अर्थाने विकतच मिळते. लोकप्रतिनिधींचे जनतेच्या वेदनाशी कोणते नाते आहे.?असे म्हणता येईल?

खा.स्मितातांईबद्दल व्यक्तिगत आकस व द्वेष नाही. यात राजकारण नाही. त्या मोठ्या आजाराशी झुंज देत आहे. तरीही काम करीत आहे. परंतु काम कोणासाठी करीत आहेत? त्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भाजप अशा संघटनांमध्ये गेल्या ४० वर्षापासून क्रियाशील असताना, प्रचंड अभ्यास, अनुभव आणि सत्तेची पदे असतानाही डांगर उर्फ उदयनगरच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न का सुटला नाही? डांगरच उदयनगर झालं पण ग्रामस्थांना पाणी मिळालं नाही. १२ वर्षापासून राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता असताना स्मिता ताईंना! स्वतःच्या गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न का सोडवता आला नाही?अशी टीका त्यांनी केली आहे.

## महात्मा फुले हायस्कूल येथे नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत




प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील सुवर्ण महोत्सवी शाळा महात्मा फुले हायस्कूल येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.**

शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जे.एस. पवार होते. शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक व वह्या वाटप करण्यात आले. नवीन प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या पहिल्या दिवशी सालाबादाप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते दिनेशशेठ लोहार यांच्याकडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कांदापोहे व गुळाची जिलेबीचा अल्पोहार देण्यात आला. याप्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका एम.के. कापडणे, एम.बी.मोरे, एस.व्ही.आढावे, एस.एन.कोळी, पी.डी.पाटील, व्ही.टी.माळी, व्ही.पी.वऱ्हाडे, नूतन प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक अतुल सूर्यवंशी, अरुण शिरसाठ, ग्रंथपाल गोपाल महाजन, लिपिक जे.एस.महाजन, पी.डी. बडगुजर, अशोक पाटील, जीवन भोई उपस्थित होते. प्रास्ताविक एच.डी.माळी यांनी केले.

# शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी करण्यात यावी

## राष्ट्रवादी काँग्रेस शप पक्षातर्फे तहसीलदारांना निवेदनाद्वारे साकडे

प्रतिनिधी । धरणगाव

**शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी करण्यात यावी,अशी मागणी धरणगाव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.**



राज्यातील शेतकऱ्यांसाठी सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून ही योजनेतील जाचक अटी-शर्ती बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे. तसेच राज्यभरातील लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट आहे. परिणामी संबंधित शासन निर्णय बदलण्याची आवश्यकता आहे. या योजनेत सन २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेले अल्पमुदत पीककर्जाची २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. परंतु ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे. त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. २०१९ साली राज्यातील सुमारे ३३ लाख शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घेतला होता. याचाच अर्थ यंदाच्या कर्जमाफीतून या ३३ लाख शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळणार नाही. सदरील योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाखांहून अधिक आहे, त्यांनी एकवेळ समझोता अंतर्गत २ लाखांवरील रक्कम भरली तरच त्यांना २ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे आणि सध्या त्यांचे कर्ज ५० हजाराहून अधिक आहे त्यांनी उर्वरित रक्कम भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील अटीनुसार ज्या शेतकऱ्यांनी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ यापैकी कोणत्याही दोन वर्षातील पीक कर्जाची वेळेत परतफेड केली असेल त्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. परंतु हा प्रोत्साहनपर लाभ मिळवण्यासाठी त्या शेतकऱ्याने सन २०२५-२६ आणि सन २०२६-२७ चे पीककर्ज भरले असणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा होतो की जर शेतकऱ्याला प्रोत्साहनपर अनुदान हवे असेल तर आधी शेतकऱ्याला आधीच्या दोन वर्षाचे आणि २०२५-२६ आणि २०२६-२७ चे असे एकूण चार वर्षाचे कर्ज भरणे बंधनकारक आहे. २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी. यासह विविध मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार संदीप मोरे यांना देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रा. एन. डी. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, मोहन पाटील, माजी सरपंच उज्वल पाटील, महिला जिल्हाध्यक्ष कल्पिता पाटील, तालुकाध्यक्ष संजय पाटील, कार्याध्यक्ष हितेंद्र पाटील,लक्ष्मणराव पाटील, रविंद्र वाघ, देविदास धनगर, नारायण चौधरी, अमित शिंदे, मकरध्वज पवार, महादू धनगर, अमोल हरपे, युवक तालुका उपाध्यक्ष दिनकर पाटील, प्रमोद पाटील, धरणगाव शहराध्यक्ष जुनेद बागवान, कार्याध्यक्ष सागर महाले, उपाध्यक्ष समाधान महाजन, राजिद कुरेशी, प्रफुल पवार, साहिल खान, मयूर पाटील, रुपेश सूर्यवंशी यांच्यासह डिगंबर पाटील, युवराज पाटील, गोरख पाटील, विजय पाटील, धुडकु पाटील, भागवत माळी, चत्रभुज पाटील, त्र्यंबक पाटील आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

## एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पाणीसाठा-खरीप हंगामाचा मुख्य सचिवांनी घेतला आढावा

प्रतिनिधी । जळगाव

**हवामान बदल आणि एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून भविष्यात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी तसेच खरीप हंगामाचे प्रभावी नियोजन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा बैठक पार पडली.**



या बैठकीत जिल्हानिहाय पाणीसाठा, जलसंधारण, शेती सज्जता आणि कृषी इनपुट उपलब्धता यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील प्रमुख, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठ्याची सद्यस्थिती, पाणी विसर्गाचे नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन यावर चर्चा झाली. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. तसेच आगामी खरीप हंगामासाठी पिकांची लागवड स्थिती, बियाणे व खतांचा पुरेसा साठा आणि शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्धता याबाबत कृषी विभागास आवश्यक निर्देश देण्यात आले. बियाण्यांची टंचाई निर्माण होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सुचना घेण्यात आल्या.

हवामानातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सर्व स्तरांवर सज्ज राहून शेतकरी बांधवांना तांत्रिक मार्गदर्शन, हवामानविषयक माहिती आणि वेळोवेळी आवश्यक सूचना देण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. यावेळी जिल्हा प्रशासन, महसूल, जलसंपदा आणि कृषी विभाग यांच्यात समन्वय ठेवून संभाव्य परिस्थितीचा प्रभावी सामना करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना सुरू असून संबधित सर्व विभाग समन्वयाने काम करत आहे.

# शेतीपंपासाठी शेतकऱ्यांना अखंड वीज द्या : आ.अनिल पाटील

## आमदारांची महावितरण अधिकाऱ्यांसोबत झाली बैठक

प्रतिनिधी । अमळनेर

**शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन अमळनेरचे आमदार अनिल भाईदास पाटील यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत विशेष बैठक घेतली. या बैठकीत शेतीपंप वीजपुरवठ्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा करून महत्त्वाच्या सूचना केल्या.**



शेतकऱ्यांना पेरणी, रोप लावणी व पिकांच्या पाण्यासाठी नियमित व खंडमुक्त वीज मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहे. ही बाब लक्षात घेऊन आ. पाटील यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना सांगितले की,

शेतीपंपांना प्राधान्य द्या, रोस्टिंग/लोडशेडिंगचा फटका शेतीपंपांना बसू नये, यासाठी स्वतंत्र फीडरद्वारे किंवा ठराविक वेळेत किमान ८ तास दर्जेदार वीजपुरवठा देण्यात यावा,.220 KV व 33 KV उपकेंद्रांवरील तांत्रिक दुरुस्ती वेळेत पूर्ण करून ट्रिपिंग व खंडाचे प्रमाण कमी करावे, तक्रार निवारण– शेतकऱ्यांच्या वीज तुटणे, कमी दाब अशा तक्रारी तातडीने सोडवण्यासाठी स्थानिक पातळीवर यंत्रणा सक्षम करावी.

यावेळी आ. अनिल पाटील म्हणाले की, शेतकरी हा देशाचा कणा आहे. पेरणीच्या काळात त्यांना विजेची सर्वाधिक गरज असते. त्यामुळे महावितरणने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे.महावितरण अधिकाऱ्यांनी आमदारांच्या सूचनांची नोंद घेत लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले.

### ➤ शेतकरी हिताला प्राधान्य द्या

अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांनी आ. अनिल पाटील यांना निवेदन देऊन शेतीसाठी अखंड वीज पुरवठा मिळावा, अशी मागणी केली होती. त्यामुळे आ. अनिल पाटील यांनी शेतकऱ्यांचा पप्रश्शन तातडीने सोडवावा, यासाठी महावितरण अधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलवून बैठकीत शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना अखंड वीजपुरवठा करावा, पेरणीचे दिवस असल्याने शेतकऱ्यांना पाण्याची मोठी गरज भासते. यासाठी वीजपुरवठा सुररु ठेवण्याचे निर्देश आ पाटील यांनी दिले.

# अडावद येथे कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी । चोपडा



**तालुक्यातील अडावद येथील वरचा माळी वाड्यातील शेतकरी गोविंदा चैत्राम गंभीर (६५) या शेतकऱ्याने गतवर्षी आलेले अल्प उत्पन्न, या वर्षीच्या हंगामाने भरून काढू म्हणून पावसाची वाट पाहत होता. परंतु पाऊस लांबल्याने लोकांची देणी कशी फेडायची? आता आपला प्रपंच कसा चालवायचा? या विवंचनेत त्याने रात्री छतावरून उडी मारून आत्महत्या केली.**

१४ रोजी रात्री १.४५ वाजेच्या सुमारास शेतकरी गोविंदा चैत्राम गंभीर (६५) या शेतकऱ्याने राहत्या घराच्या छतावरून उडी घेत आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

गोविंदा गंभीर यांचेकडे पाच एकर कोरडवाहू शेती होती. त्यांनी गेल्या वर्षी मका लावला होता. त्यातही अपेक्षित उत्पन्न झाले नाही. यावर्षी चांगले उत्पन्न काढू, असा विचार करीत कर्ज काढून त्यांनी शेत तयार केले. मात्र पाऊस लांबल्याने पुढील हंगामाचे उत्पन्न कसे येईल ? आपले देणे कसे फिटेल ? प्रपंच कसा चालवायचा ? या विवंचनेत. त्यांनी रात्री आपल्या घराच्या गच्ची वरून उडी घेत आपली जीवनयात्रा संपवली. शेतकऱ्याचे १५ रोजी चोपडा उपजिल्हा रुग्णालयात सकाळी १० वाजता शवविच्छेदन करण्यात आले. दुपारी १२ वाजता अडावद येथे नातेवाईकांनी अंत्यसंस्कार केले. याबाबत चोपडा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

---

**जळगाव ।** शासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन व भविष्य निर्वाह निधी संदर्भातील अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हा पेंशन/पीएफ कार्यशाळेचे आयोजन दि. १९ जून रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे.

## ● निधन वार्ता

### निर्मला कोलते




**जळगाव ।** येथील मु.जे. महाविद्यालया मागील रहिवासी निर्मला मुरलीधर कोलते (वय ७० रा. भादली) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या पल्लवी भोळे व प्रीती पाटील यांच्या आई होत.

### पुंडलिक बऱ्हाटे



**चोपडा ।** नांदेड ता.धरणगाव येथील ह.मू. पंकज नगर मधील रहिवासी पुंडलिक लहानू बऱ्हाटे (वय ९२) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्याच्या पच्यात पत्नी,२ मुले, सुना, नातवंडे असा परिवार होता. ते उदय बऱ्हाटे, संजय बऱ्हाटे यांचे वडील तर शिक्षिका मोहिनी सं. बऱ्हाटे यांचे सासरे होत.

### भगवान कोळी



**चोपडा ।** चौगाव येथील रहिवासी भगवान महादू कोळी (वय ६८) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि. १७ रोजी बुधवारी स. १० वा. राहात्या घरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी,सूना व नातवंडे असा परिवार आहे. चौगाव येथील माजी सरपंच दगडू महादू कोळी यांचे ते भाऊ होत.

# अडावदच्या महाजन विद्यालयात विद्यार्थी प्रवेशोत्सव सोहळा

प्रतिनिधी । अडावद ता. चोपडा

**येथील श्री संत सावता माळी शैक्षणिक व सामाजिक संस्था संचालित शामराव येसो महाजन विद्यालय व खासगी आदर्श प्राथमिक शाळा यात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.**




। खासगी आदर्श प्राथमिक शाळेत नवीन प्रवेश घेणारे व शाळेत पहिल्या दिवशी येणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे उपाध्यक्ष वासुदेव माळी हे होते. तसेच पालक संदीप भोई, फारुख भाई, सचिन राणे, महेंद्र महाजन, रेखा महाजन, कविता महाजन हे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक डी.बी. महाजन, उपशिक्षक आर. जे.महाजन, योगेश साळुंखे, दिनकर वाघ, कामिनी चौधरी, पुनम सुतार, मेघा महाजन त्यांचे सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.टी. महाजन यांनी केले व आभार आर. जे.महाजन यांनी मानले. तसेच दुपारी १२ वाजता पाचवीच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आर. के. पिंपरे, उपशिक्षक एन.ए. महाजन, एस.जी.महाजन, एम.एन. माळी, पी.आर.माळी, एस.बी. चव्हाण, एस.के.महाजन आदींची उपस्थिती होती.

# अनवर्दे खुर्द येथे गोठ्याला आग; चारा जळून खाक

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अनवर्दे खुर्द येथे सायंकाळी ६ वाजेच्यासुमारास गुरांच्या गोठ्याला आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना घडली.**



गावातील रहिवासी गजानन रूपचंद शिरसाट त्यांच्या मालकीच्या गोठ्यात अचानक आग लागली. यात गुरांच्या चारा व नागर जळून खाक झाले.

अचानक लागलेल्या आगीने रौद्ररूप धारण केले असता गावकऱ्यांनी धाव घेत आग विझविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू झाले.

जवळच असलेल्या बोअरवेल सुरू करून पाणी मारण्यात आले. तोवर चोपड्याहून अग्निशामक दल दाखल झाले त्यानंतर आग आटोक्यात आली.

# मोफत शैक्षणिक साहित्य वाटपासह प्रताप हायस्कूलचा प्रवेशोत्सव



प्रतिनिधी । अमळनेर

येथील प्रताप हायस्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळा प्रवेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात रांगोळी, पताका सजावट व विविध संदेशपर फलकांमुळे उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

प्रवेशोत्सवानिमित्त शाळेचे चेअरमन नीरजा अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन, भांडारकर शाळेचे चेअरमन प्रदीप अग्रवाल, मुख्याध्यापिका एस. पी. बाविस्कर तसेच शिक्षक प्रतिनिधी डी. एन. पालवे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यानंतर शालेय प्रार्थना व राष्ट्रगीत झाले. प्रताप शेठजी, साने गुरुजी व सरस्वतीमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती बाविस्कर यांनी केले. यावेळी अमळनेर शहरातील विविध दात्यांनी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, सहा वहींचा संच, कंपास पेटी, दप्तर आणि शालेय गणवेश प्रदान करण्यात आले. शाळा ११८ व्या वर्षाकडे वाटचाल करीत असल्याने प्रवेशोत्सवाला पालकांनीही मोठी उपस्थिती दर्शविली. साहित्य वितरणाचे नियोजन एन. आर. पाटील, सचिन अहिरे, नम्रता दोरकर, जयश्री पाटील, सागर पवार आणि प्रसाद गोसावी यांनी पाहिले. शिस्त व्यवस्थेची जबाबदारी लक्ष्मण पाटील व के. जी. कोळी यांनी सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. ए. खांजोडकर यांनी केले.

# मंत्री रक्षा खडसे यांची घनश्याम चौधरींकडे सांत्वनपर भेट

प्रतिनिधी । चोपडा

**केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी १५ जून रोजी चोपडा मल्हारपुरा भागातील रहिवासी घनश्याम चौधरी यांचे घरी जाऊन कुटुंबियांचे सांत्वन केले.**



घनश्याम चौधरी यांचा एकुलता मुलगा दुबई येथे नोकरीला होता. ३१ मे रोजी त्याचे निधन झाल्याची माहिती मिळाली. चौधरी कुटुंबांचे सांत्वन करण्यासाठी रक्षा खडसे आल्या होत्या. परिवारातील सर्व सदस्यांना धीर देत पुढील कामात मदतीचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक गजेंद्र जयस्वाल, माजी नगरसेवक सुनील चौधरी, चोपडा तेली समाजाचे अध्यक्ष के.डी.चौधरी आणि चौधरी परिवारातले सदस्य उपस्थित होते. राजेंद्र गणपत चौधरी यांनी त्यांचे आभार मानले.

# अमळनेर रेल्वे स्थानकावर आरपीएफ जवानाचा आत्महत्येचा प्रयत्न, प्रकृती गंभीर

प्रतिनिधी । अमळनेर



**येथील रेल्वे स्थानक परिसरात मध्यरात्री १२ ते १ वाजेदरम्यान, रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) मधील जयपाल नामक जवानाने स्वतःवर डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.**

ही घटना आरपीएफ कार्यालयात घडल्याचे समजते. जवानाने डोक्यात गोळी झाडून जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. तत्काळ जखमी जवानाला वैद्यकीय उपचारासाठी हलविण्यात आले. त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी धुळे येथे रवाना करण्यात आले आहे. या दरम्यान डॉ. अनिल शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# चोपडा शहर पोलिसांनी बेकायदा गावठी कट्टा बाळगणाऱ्यास केली अटक

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा शहर पोलिसांनी बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या एका तरुणाविरुद्ध कारवाई करत त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून गावठी कट्टा, मोबाईल व दुचाकीसह एकूण ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



येथील शहर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी विलास पारधी यांना गुप्त माहिती मिळाली होती की, एक तरुण विनापरवाना गावठी कट्टा घेऊन लासूर-चुंचाळे मार्गे चोपडा शहराकडे दुचाकीवरून येत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी चुंचाळे गावाजवळ सापळा रचून संशयित वाहनचालकाला ताब्यात घेतले.

झडतीदरम्यान संशयित विनोद वसंतराव पावरा (वय २४, रा. अमलवाडी, ता. चोपडा) याच्या कमरेला ३० हजार रुपये किमतीचा स्टीलचा गावठी कट्टा आढळून आला. तसेच त्याच्या ताब्यातील १० हजार रुपये किमतीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल आणि ४५ हजार रुपये किमतीची होंडा लिओ दुचाकी (क्र. MH-19-CS-6198) जप्त करण्यात आली. अशाप्रकारे एकूण ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

कारवाईनंतर घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले असून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. याप्रकरणी पोलीस कर्मचारी विलास पारधी यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अपूर्ण पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; सुरळीत पुरवठ्याची मागणी

## ● वामन नगरातील नागरिकांनी पाणीपुरवठा सभापतींकडे निवेदन केले सादर

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरातील वामननगर परिसरातील वार्ड क्रमांक ७ मधील काही भागात गेल्या दोन आठवड्यांपासून अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी पाणीपुरवठा सभापतींकडे निवेदन सादर केले. नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे.**



नळाला पाणी सोडल्यानंतरही वामननगर, पिंपळ रोड व टॉवर गल्ली परिसरातील सुमारे १० ते १५ घरांपर्यंत पाणी पोहोचत नाही. याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांकडे वारंवार विचारणा करूनही समाधानकारक तोडगा निघालेला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पिंपळरोड वार्ड क्रमांक ७ मध्ये योग्य नियोजन करून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा. तसेच संबंधित कर्मचाऱ्याकडून वस्तुस्थितीची चौकशी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. उन्हाळ्याच्या काळात पाण्याअभावी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने नियमित व पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर जिजाबराव सर्जेराव देवरे, निंबा तुळशीराम पाटील, विकास शेवाळे, वाल्मिक भाऊराव पाटील, ज्ञानेश्वर तुकाराम बावीस्कर, विजय भिका पाटील, अनिल सुरेश चौधरी, ताराचंद बहादूर पाटील, विकास अरविंद पाटील, राजेंद्र शांताराम नेरकर, राजेश्वर दिलीप नेरकर, समाधान सुरेश नेरकर, वैष्णवी मुकेश पाटील व राजेंद्र दामू सोनवणे आदी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गणपूर येथे विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गणपूर जि. प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची आज सकाळी गावातून प्रभात फेरी काढत जनजागृती करणण्यात आली. सजवलेल्या रिक्षातून आवाहन करत विद्यार्थ्यांना शाळेत येण्याचे आवाहन करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.**

शाळेत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वाटप शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष मनीषा पाटील, शिक्षण तज्ञ ऍड.बाळकृष्ण पाटील, मुख्याध्यापक संजीवकुमार पाटील, रमेश पाटील, किशोर पाटील,आदी उपस्थित होते.